# प्रेसनोट

दि.१०/०१/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी.पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७(अ),१२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)प्रियांका अजय लामखडे, वय–३५ वर्ष, सरपंच, निंबळक, ता.नगर, जि.अहमदनगर रा.निंबळक, ता.नगर, जि.अहमदनगर<br>२)दत्ता वसंत धावडे, वय–४० वर्ष, व्यवसाय–नोकरी, लिपीक, ग्रामपंचायत निंबळक, ता.नगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे कंत्राटदार असुन, त्यांनी निंबळक गावातील निंबळक–लिंगतीर्थ रस्त्याचे मजबुती करण्याचे कामाचा ठेका जिल्हा परिषद अहमदनगर कडुन मिळाला होता. त्यांनी सदर रस्त्याचे काम वेळेत पूर्ण करुन केलेल्या कामाचे बील रु.१३,६५,०५६/– मंजुरीसाठी जिल्हा परिषद मध्ये सादर केले होते. सदर बिल मंजूर होऊन ग्रामपंचायत निंबळक यांचे बँक खात्यामध्ये जमा झाले होते. तक्रारदार यांना रु.१२,३८,५५६/– चा चेक सरपंच व ग्रामसेवक यांचे सहीचा मिळाला होता त्यावेळी सुध्दा आरोपी लोकसेविका क्रमांक १ प्रियांका अजय लामखडे यांनी तक्रारदार यांचेकडुन पैसे घेतले नंतरच चेक वर सही केली होती. तक्रारदार यांचे बिलातील रु.१,२६,०००/– रक्कम जी.एस.टी. पोटी ग्रामपंचायत ने राखुन ठेवली होती. तक्रारदार यांनी जी.एस.टी. पुर्तता करुन रु.१,२६,०००/– रकमेचा चेक ग्रामपंचायत निंबळक च्या ग्रामसेविका यांचेकडे मागणी केली असता, ग्रामसेविका यांनी चेक वर सही करुन चेक तयार करुन ठेवला होता, परंतु सदर चेक वर सही करण्यासाठी यातील आरोपी लोकसेविका क्रमांक १ प्रियांका अजय लामखडे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.२०,०००/– ची मागणी केली असल्याची तक्रार, तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे आज दि.१०/०१/२०२३ रोजी दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दि.१०/०१/२०२३ रोजी निंबळक येथे लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक क्र.१ प्रियांका अजय लामखडे व क्र.२ दत्ता वसंत धावडे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.२०,०००/– लाचेची मागणी करुन सदर रक्कम आरोपी लोकसेवक क्र.१लामखडे यांनी आरोपी लोकसेवक क्र.२ धावडे यांचेकडे देण्यास सांगितले. रक्कम मिळाले नंतरच तक्रारदार यांचे बिलाचे चेक वर सही करेन असे आरोपी लोकसेवक क्र.१ लामखडे यांनी सांगितलेचे स्पष्टपणे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.१०/०१/२०२३ रोजी निंबळक ग्रामपंचायत समोर लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक क्र.२ धावडे याने तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष रु.२०,०००/– लाच स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर